# राशिभविष्य - मे, २०१५.

दादा दामले (dadadamle@gmail.com)

==============================================================

**(१) मेष** - या राशीच्या मंडळीनी या महिन्याच्या काळात मनाचा क्षोभ न होऊ देता संयम व सहनशीलतेचे आचरण करणेच सुखाचे होईल. कारण गुरु-शुक्र हे शुभ ग्रह सोडून इतर सर्व ग्रह प्रतिकुल असणार आहेत. त्यामुळे मनाविरुद्ध घटना घडणे, नियोजित कार्यात अडथळे येणे, प्रगती खुंटणे, मतभेद, गैरसमज यांमुळे प्रिय जनाशी वाद, भांडणे होणे, फसवणूक होणे, खर्च वाढणे पण अर्थप्राप्तीस विलंब होणे, आर्थिक नुकसान होणेअशापैकी घटना घडण्याची दाट शक्यता वाटते. त्यामुळे असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. अशा विविध कारणानीच शारीरिक-मानसिक अनारोग्य होणेही संभवते. श्रम , दगदग झाल्यास थकवा येईल. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी मन व विचारशक्ती शांत व स्थिर राखावी. नपेक्षा शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकारांचा त्रास सहन करावा लागेल. जपा. विशेष करून डोळे, घसा, मान, दाढा दुखणे अशापैकी आजार होण्याचीशक्यता दिसते. जपा. अकारण चिंता करू नका. या राशीच्या अष्टम स्थानी शत्रू राशीतील शनि ग्रहामुळे काही मंडळीना एखाद्या मोठ्या आजाराला तोंड द्यावे लागण्याची शक्यता वाटते. जपा. अपेक्षाभंगामुळे मन सतत अशांत राहील. अशा सर्व कारणांमुळे स्वभाव लहरी, विक्षिप्त होणेहीसंभवते. कुमार्गी लोकांपासून सावध राहा. अशा सर्व प्रतिकुल परिस्थितीतही शुभ ग्रह गुरु-शुक्रामुळे या राशीच्या काही मंडळीना भूमिलाभ, काहीना धनलाभ, काहीना मानाचे स्थान असे काही मिळण्याची शक्यता दिसते. तसेच शेतीवाडी असणारांना लाभ होईल. कौटुंबिक सुखसमाधान लाभेल पण नातेवाईक मंडळीपासून त्रास होणे संभवते. परधर्मीयांशी व्यापारी संबंध असणाराना काळ लाभदायक होईल. श्रद्धा असेल तर शिवोपासना व श्रीगणेश उपासना अनुकुल होईल.

**(२) वृषभ** - या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. विविध कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागल्याने गहरे नैराश्य येणे संभवते. हाती घेतलेल्या कार्यात अडचणी, अडथळे निर्माण होणे संभवते. तसेच वर्तमान हट्टी स्वभावावर नियंत्रण ठेवू शकलात तर अकारण श्रम , दगदग होणार नाही; व थकवा न येता आरोग्यही चांगले राहू शकेल. नपेक्षा शरीरपीडाहोईल व

अनारोग्यास निमंत्रण दिले जाईल. जपा. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी विशेष जपावे. मंगळ-बुध युतीमुळे कुसंगतीची बाधा होणे संभवते. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळीना काल अनुकुल नसल्याने त्यांनी सतत नमते घेऊन काळ व्यतीत करावा. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या राहूमुळे या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी जपावे व अकारण दगदग करू नये. या राशीच्या मंडळीना अपेक्षितसंततिसुख मिळण्याची शक्यता कमी वाटते. पण दलाली, कमिशनवर व्यवसाय असणारांना मात्र काळ अनुकुल व लाभदायक होईल. सप्तम स्थानी शत्रू राशीचा शनि ग्रह असल्याने जीवनसाथीचे अनारोग्याची समसया त्रस्त करील व त्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखातही बाध येणे संभवते. जपा. गुरु-हर्षल अंशात्मक शुभ योग योग असेल तर या राशीच्या काही मंडळीना अनपेक्षितपणे अर्थलाभ होण्याची शक्यता दिसते. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या उच्च राशीतील गुरु ग्रहाम ुळेया राशीच्या लेखकांचे लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध होऊ शकेल. प्रवासाचे योग येतील. पण काही कारणाने भावंडाकडून मनस्ताप दिला जाण्य ाची शक्यता वाटते. जपा. शुक्रामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. कुटुंबात शुभ घटना घडतील. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमा न उपासना अनुकुल होईल.

**(३) मिथुन -** या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक असणार आहे. महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती बदलली जाणार आहे याची जाणीव ठेवून जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करा. अध्यात्मात रस असणाऱ्या मंडळीना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती साधण्यास महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल होईल. तसेच काही मंडळीना सूचक स्वप्ने पडतील; काहींना परदेशगमनाची संधी मिळेल. उच्च राशीतील गुरु ग्रहामुळे कुटुंबात शुभ घटना घडतील, स्वतंत्र व्यवसाय असणार ांच्याव्यवसायात प्रगती व वाढ होऊन अपेक्षेपेक्षा अधिक अर्थलाभ होणे संभवते. त्यामुळे सुखसमाधान लाभेल; पण राहूमुळे गृहसौख्यात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या षष्ठ स्थानी शत्रुराशीतील शनि वात पित्तकारक आजार निर्माण कारीलसे ेदिसते तसेच तो या राशीच्या ज्या मंडळीना कुयोगकारक असेल त्यांना अकारण बदनाम करण्याची शक्यताही जाणवते. जपा. पण तोच शनि यांत्रिक तांत्रिक व्यवसाय असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होण्याची शक्यता जाणवते. या राशीची जी मंडळी हातचे सोडून नवीन काही करू इच्छितात त्यांना स्पष्ट सांगावेसे वाटते कीत्यांनी सध्या आहे तो नोकरी-व्यवसायच

मनापासून करावा. नवीन काही करण्यास काळ अनुकुल नाही. शास्त्रीय संशोधन क्षेत्र , उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल व प्रगतिकारकहोईल. शुभ ग्रह गुरु-शुक्र यांच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रद्धेने बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

(४) **कर्क** - या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ खूपच अनुकुल व प्रगतिकारक होईलसे दिसते. केवळ संततीबाबत काहीसमस्या त्रस्त करतील असे वाटते. शिवाय जल आणि विष भय असल्याने शक्यतो जलप्रवास करू नका; आणि बाहेरचे उघडे पदार्थ खाऊ नका. लग्नस्था नी उच्च राशीतील गुरु ग्रह असल्याने आरोग्य उत्तम राहीलच; पण उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना गुरु-शनि व गुरु-हर्षलशुभ योगामुळे अपेक्षित प्रगतीहोणे , यश व अर्थलाभ होणे संभवते. या राशीच्या सर्वच नोकरदार मंडळीना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल होईलच; पण शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना बढती, अधिकार पद किंवा मानाचे स्थान मिळण्याची शक्यताही दिसते. जन्मकुंडलीत योगअसेल तर काही मंडळीना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणेही शक्य आहे. या राशीच्या साहित्यिकांना त्यांचे नवे साहित्य प्रकाशित होण्यास काळ अनुकुल होईल. आरोग्य उत्तम राहील. मन मोठे, उदार, राहील व मानसिक सुखशांती लाभेल. पण बंधुसुखात बाधा येण्याची शक्यता दिसते. जपा. वकिली, सल्लागारी व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. शुक्रामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व खूप मोकळे वाटेल. सामान्य नोकरी असणारांना मात्र कष्ट परिश्रम करून च अपेक्षित अर्थलाभ होण्याची शक्यता आहे. अशा सर्व अनुकुल परिस्थितीत मैत्रीत बाधा येणार नाही, याची मात्र काळजी घेणे जरूरीचे होईल. मन:शांतीसाठी दररोज झोपी जाण्यापूर्वी थोडा वेळ तरी प्रार्थनेत व्यतीत करा.

(५) **सिंह** - या राशीच्या मंडळीनी या महिन्याच्या काळात सतत सर्व ठिकाणी व कोणतेही काम करत असताना अत्यंत सावधानतेने काळजीपूर्वक आचरण करावे, असे मुद्दाम सांगावेसे वाटते. कोणत्याही क्षणी कसा अपघात होईल हे सांगता येत नाही. जपा. मन व बुद्धी स्थिर राहण्यासाठी शिवोपासना अनुकुल होईल. या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल होणार आहे. महिन्याच्या पूर्वार्धात मानसिक ताण व मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची दाट शक्यता दिसते.

म्हणून मनावर ताबा ठेवून व रागावर नियंत्रण ठेवून तसेच जिभेला लगाम लावून आचरण करणेच सुखाचे होईल. नोकरी-व्यवसायात कामाचा ताण सहन कर ावालागेल. कामात चुका होणार नाहीत याची काळजी घ्या. या राशीच्या युवकांना हातचे सोडून नवीन काही करावेसे वातेल; पण मनावर ताबा ठेवून आहे ती नोकरीच व्यवस्थित करा. यांत्रिकतांत्रिक नोकरी व्यवसाय असणारांना काळ काही प्रमाणात अनुकुल होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या शत्रू राशीतील शनीमुळे कौटुंबिक सुख व गृहसौख्य विविध कारणांनी बाधा येणे संभवते. जपा. त्यामुळे काही मंडळीना गहरे नैराश्य येण्याची शक्यता दिसते. जपा. धनस्थानी असलेल्या राहूमुळे आर्थिक समस्या त्रस्त करतील. कुटुंबातील सदस्यात वाद, भांडणे होणे संभवते. जपा. दांपत्य जीवनातही अपेक्षित सुख मिळेलच याची खात्री देता येत नाही. अध्यात्मात रस असणारांना व सामाजिक कार्याची आवड असणारांना काळ अनुकुल होईल. शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. शुक्राच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुक ुलघटना घडतील व दिलासा मिळेल. कुलदेवतेची उपासना करा.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही असेच म्हणावे लागेल. शिवाय उगीचच " आपल्याला कसला तरी आजार झाला आहे " ही भावना त्रस्त करील. सतत मनाविरुद्ध घटना घडतील. गुरु-शनि शुभ योग ामुळे या चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना नवी उत्तम नोकरी मिळणे संभवते. किंवा मनाला भावणारे नवे कार्यक्षेत्र मिळू शकेल. रवि-बुध पूर्णपणे प्रतिकुल असल्याने या राशीच्या नोकरदार मंडळीना शारीरिक-मानसिक आजारांना तोंड द्यावे लागेल. कसली तरी चिंता त्रस्त करील. काहीना पोटविकाराचा तर काहीना मूत्रविकाराचा त्रास होणे संभवते. तसेच काहीना ज्वर येणेही शक्य आहे. जपा. त्यात भर म्हणून काहीना नोकरीत वरिष्ठ अधिकाऱ्याचा विरोध, त्रास सहन करावा लागेलसे दिसते. जपा. वैवाहिक जीवनात जीवनसाथीचे विक्षिप्त आचरण किंवा दोघांतील मतभेद, वाद यांमुळे दाम्पत्यजीवनातील सुखही मिळेलसे ेदिसत नाही. जपा. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी भागीदारीत संशयाने किंवा गैरसमजाने बाधा निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी. कोर्ट प्रकरणे असतील तर ती पुढे ढकंलण्याचा प्रयत्न करावा. महिन्याच्या उत्तरार्धात घरीदारी मानहानी व विरोध होत असल्याचे पाहून गहरे नैराश्य येणे संभवते. जपा. शक्यतो प्रवास करू नका. प्रवास्ता त्रास व मनस्ताप सहन करावा लागण्याची दाट शक्यता दिसते. कलाक्षेत्रातील मंडळीना अडचणी व

मनस्ताप सहन करीतच काळ व्यतीत करावा लागेलसे दिसते. अशा परिस्थितीत उच्च राशीतील गुरु ग्रह लाभस्थानी असल्याने या राशीच्या विद्यार्थ ्यांना अपेक्षित शैक्षणिक प्रगती करणे व यश मिळविणे शक्य होईल. काही मंडळीना वाहनसुख मिळेल; तर या राशीच्या विवाहेच्छू वधूवरांचे विवाह ठरतील व संपन्न होतील. काहींचे मनेप्सित पूर्ण होईल. श्रीगजानन व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल.

(७) तुळा - सध्या या राशीच्या मंडळीचे मन अत्यंत भावनाशील झाले असण्याची शक्यता जाणवते. सात्विक सुखशांती अपेक्षित असेल तर या राशीच्या मंडळीनी आध्यात्मिक साधनेकडे अधिक लक्ष द्यावे असे आवर्जून सांगावेसे वाटते. त्यामुळे कोणतेही कार्य असो, त्यात अडथळे येत असल्याचा अनुभव येताच गहरे नैराश्य येणे संभवते. शिवाय आध्यात्मिक प्रगतीसाठी सध्याचा काळ अतिशय अनुकुल आहे. त्यातून गुरुकृपा प्राप्त होणेही शक्य आहे. शिवाय येणारा मानसिक ताण येणारच नाही व त्यामुळे सर्व काही सुखाचेच होईल. कुटुंबस्थानी असलेल्या शत्रुराशीतील शनीमुळे मनस्ताप देणाऱ्या घटना घडणे संभवते. तसेच आर्थिक समस्याही त्रस्त करतील. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे शारीरिक-मानसिक कष्ट सहन करावे लागतीलसे दिसते. त्यामुळे शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकारांचे आजार बळावण्याची शक्यता जाणवते. जपा. विशेष करून मूळव्याधी सारख्या आजाराचा त्रास होण्याची दाट शक्‍यतावाटते. महिन्याच्या उत्तरार्धात जीवनसाथीच्या व मुलांपैकी कोणाच्या तरी अनारोग्याची समस्या त्रस्त करण्याची शक्यता आहे. जपा. सतत सावधानतेने आचरण करा व वाहन नियमानुसार ठरलेल्या वेगाने चालवा. विचाराच्या तंद्रीत , मोबाईलवर बोलता बोलता चालवू नका. अपघात भय आहेच. बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणाराना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. व्ययस्थानी असलेल्या राहूमुळे काहीना अर्थलाभ तर काहीना परदेशगमनाची संधी मिळेल. गुरु-शुक्राच्या अनुकुलत ेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. गुरु दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल.

(८) वृश्चिक - शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ आहे ही गोष्ट सतत ध्यानात घेऊन मन व बुद्धीवर नियंत्रण ठेवून व सहनशीलतेचे आचरण करून काळ व्यतीत कराल तर खूपच सुखाचे होईल. महिन्या चा पूर्वार्ध शासकीय, निम- शासकीय नोकरदार मंडळीना अनुकुल व लाभदायक होईल. त्यामुळे जे काय साधले जावे अशी मनापासून इच्छा आहे

ते साध्य करण्याचा आटोकाट प्रयत्न करा. यश मिळेल. उत्तरार्धात काहीही करता येणार नाही. लाभस्थानी असलेल्या राहूमुळे या राशीच्या काह्ी कर्तृत्ववान मंडळीना बढती, अधिकार पद असे काही मिळू शकेल. पण अशा अधिकारपदाचा दुरुपयोग करून वाममार्ग धन मिळविण्याचा प्रयत्न कराल तर हाती धुपाटणे येण्याचीच शक्यता आहे. जपा. उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना तसेच कलाक्षेत्रातील मंडळीना काळ अनुकुल व लाभदायक होईल. पण लग्नस्थानी असलेल्या शत्रुराशीतील शनि ग्रहामुळे प्रिय जनांच्या स्थलांतरामुळे हुरहूर लागेल. तसेच स्वत:च्या व जीवनसाथीच्या अनारोग्याच्या समस्या त्रस्त करतील. त्यामुळे काहीना गहरे नैराश्य येण्याची शक्यताही नाकारता येत नाही. महिन्याच्या उत्तरार्धात काहीना पोटदुखीचा तर काहीना मूत्राशयविकाराचा त्रास सहन कराव लागेलसे दिसते. जपा. काहीना ताप येणे, अपचन होणे अशापैकी आजार त्रस्त करील . दाम्पत्यजीवानात वाद, मतभेद होणे संभवते. त्यामुळे दोघाप्ैकी कोणाच्या तरी अनारोग्याची समस्या त्रस्त करील जपा. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी ग्यावी. भाग्यस्थानी उच्च राशीचा गुरु ग्रह असल्याने अध्यात्मात प्रगती होईल. शुक्रामुळे काहीना भूमिलाभ तर काहीना व्यवसायात भरभराट होत असल्याचा अनुभव येईल. श्रद्धेने श्रीगजानन उपासना व श्रीहनुमान उपासना करा.

**(९) धनु -** सध्या या राशीच्या मंडळीचे मन अत्यंत भावनाशील झाले असल्याची शक्यता जाणवते. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत त्यांना सुखसमाधान लाभात नसावे, असे वाटते. कोणाशीही पटत नसावे व सतत कश्ाहीबद्दल तक्रारी करत असण्याची शक्यता दिसते. ही मंडळी सध्या आहे त्या परिस्थितीत सुखाने राहात नसावीत, असेही वाटते. काहीना राहत्या वास्तूची समस्या त्रस्त करत असावे, असेही दिसते. त्यामुळे त्यांनी अध्यात्मसाधनेत रममाण व्हावे, हे उत्तम. त्यासाठी काळ अनुकुल आहे. गूढ संशोधनाची ओढ असणारानाही काळ अनुकुल व यशदायक होईल. महिन्याच्या पूर्वार्धात रवि ग्रह प्रतिकुल असल्यामुळे संततीचे आजार, स्वत:च्े अनारोग्य, नोकरीत वरिष्ठांचा त्रास , घरात प्रिय जनापासून फारकत अशापैकी घटना घडणे संभवते. त्यामुळे मन अस्वस्थ राहील व मनस्तापही ह्ोईल जपा. महिन्याच्या उत्तरार्धात रवि व बुध ग्रह अनुकुल होतील व परिस्थिती सुधारू लागेल. पण मंगळ ग्रहामुळे उष्णतेच्या विकारांचा त्ासहोणे संभवते. काहींना अपप्रचाराचा तर काहींना चोरीमुळे किंवा अन्य कारणाने आर्थिक नुकसान सोसावे लागेलसे दिसते. जपा. पण नोकरी-

व्यवसायाचे दृष्टीने महिन्याचा उत्तरार्ध अनुकुल, अपेक्षापूर्तीचा व लाभदायक होईलसे वाटते. जन्मकुंडलीत योग असेल तर या राशीच्या काही मंडळीना अचानक धनलाभ वा वारसा हक्काने धनलाभ होणे शक्य दिसते. शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ असल्याने आर्थिक व्यवहार जपून व विचारपूर्वकच करा. तसेच सतत सावधानतेने आचरण करा. उच्च राशीतील गुरु ग्रह व व्ययस्थानी असलेला शनि ग्रह यांच्यात शुभ योग असल्याने परिस्थिती हाताबाहेर जाणार नाही असे वाटते. श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल. हनुमानचालिसा स्तोत्राचे नियमित पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळीनी मानसिक स्थिती अस्थिर असल्यामुळे अविचाराने कोणतीही गोष्ट करू नये. तसेच सर्व आर्थिक व्यवहार जपून , सावधानतेन े व विचारपूर्वक करावेत असे आग्रहाने सांगावेसे वाटते. कोणास जामीन राहू नये व कोणाची आर्थिक जबाबदारी स्वीकारू नये. मनस्ताप करण्याच ीपाळी येईल. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळीना घरीदारी सर्व ठिकाणी मनस्ताप सहन करावा लागणार असल्यामुळे त्यांनी आध्यात्मिक साधनेकड े अधिक लक्षद्यावे हे उत्तम . सर्व प्रकारच्या लहानमोठ्या अपघातापासून जपावे. प्रिय जनापासून दुरावा होणे संभवते. नोकरीत वरिष्ठांचा त्रास सहन करावा लागेल. छुप्या शत्रूंचा त्रास होणे संभवते. त्यामुळेच शरीरप्रकृती बिघड ण्याची शक्यता दिसते. जपा. संततिसमस्याही त्रस्त करण्याची शक्यता आहे. या राशीच्यागर्भवती स्त्रियांनी विशेष जपावे. अकारण दगदग करू नये. काहीना कोर्ट प्रकरणे त्रस्त करतील. केवळ उच्च राशीतील गुरु ग्रह या राशीच्या सप्तम स्थानी असल्याने विवाहेच्छू युवकयुवतींचे विवाह संपन्न होणे संभवते. तसेच प्रेमसंबंध असतील तर ते घट्ट होतील. तसेच नवे स्नेहसंबंध निर्माण होतील. प्रवासाचेयोग येतील. काहीना परदेशगमनाची संधी मिळणेही शक्य आहे. या राशीच्या व्यापारीवर्गाला स्त्री ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. वकिली, सल्लागारी व्यवसाय, उच्च बौद्धि क व्यवसाय, शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. मन:शांतीसाठी श्रीगणेश उपासना व श्री हनुमान उपासना करा. हनुमानचालिसा स्तोत्राचे नियमितपणे पठण करा.

**(११) कुंभ -** या राशीच्या शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होणार आहे. म्हणून त्यांनी जे काय साधावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. सामान्य नोकरी

असणाऱ्या या राशीच्या मंडळीनी आहे त्या नोकरीतच मनापासून काम करावे. शनि-गुरु शुभ योगामुळे वकिली, सल्लागारी व्यवसाय असणारांना , लोखंड कोळसा व्यापार असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. सध्या या राशीच्या मंडळीचे मन अत्यंत कोमल झाले असण्याची शक्यता वाटते तसे असेल तर मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी लगेच नैराश्य येत असावे. तसेच विचारशक्ती अतिशय अस्थिर झाली असल्यामुळे हातून अविचाराने खर्च होणे, विचित्र आचरण घडणे, चंचल, अस्थिर व लहरी स्वभावामुळे बोलणेही फटकळ होत असावे, असे दिसते. आर्थिक चिंता असेल तर अशा गोष्टी नक्कीच घडत असतील. महिन्याच्या उत्तरार्धात रवि-मंगळ दोन्ही तापट ग्रह गृहसौख्य स्थानी एकत्र येत असल्यामुळे विविध कारणांनी कुटुंबात वाद, भांडणतंटे होणे संभवते. जपा. असमाधानकारक घटना घडतील. स्थावर संपत्तीबाबत किंवा राहत्या जागेसंबंधी समस्या त्रस्त करील. त्यामुळे काहींना गहरे नैराश्य येईल; तर काहींना अनारोग्याचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. नोकरीत अधिकारामुळे गैरमार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी तो मोह प्रयत्नपूर्वक टाळाच. स्वतंत्र व्यापार, व्यवसाय असणारांच्या उद्योगात अडचणी, अडथळे निर्माण होतीलसे दिसते. मनावर संयम ठेवून व सहनशील बनून आचरण करणेच हिताचे होईल. श्रीगुरूदत्तात्रेयाची उपासना करा. “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा “ चे पठण करा.

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळीचा स्वभाव सध्या अस्थिर, चंचल व लहरी असा झाला असल्याचेच जाणवते. त्यात हौस, मौज करण्याकडे मन ओढले जात असावे, असे दिसते. या राशीच्या लहान मुले तर अतिशय हूड व्रात्य आचरणाची असावीत असे जाणवते. असे असेल तर शांतीसाठी शिवोपासना अनुकुल होईल. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. शासकीय नोकरदार मंडळीपैकी काहीना बढती, काहीना अधिकारपद तर काहीना मानसन्मान प्राप्त होईल. महिन्याच्या पूर्वार्धात वाढता खर्च , फसवणूक, चिंता, आप्तेष्ट भांडणे यांमुळे असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. शिवाय काही मंडळीना डोळ्याची दुखणी त्रस्त करतील असे वाटते. शुक्राच्या अनुकुलतेने या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री ग्राहकांकडून अधिक लाभ होईल. काहीना भूमिलाभ किंवा धनलाभ होणे संभवते. यांत्रिक तांत्रिक व्यवसाय असणारांना तसेच वैद्यकीय व्यवसाय असणारांना आणि ओषध विक्रेत्यांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र , शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काळ प्रगतिकारक व

यशदायक होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिकप्रगती होण्यास काळ अनुकुल होईल. कौटुंबिक सुखसमाधान लाभेल व प्रेमसंबंधात वाढ होईल. पण या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या राहूमुळे दाम्पत्य जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. तसेच विचार विकृत होणे संभवते. म्हणून या राशीच्या नोकरदार मंडळीना वाममार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी तो विचार मनातूनकाढून टाका. काहीना दूरच्या प्रवासाचे योग येतील. सात्विक सुखशांतीसाठी श्रीदत्तात्रेय उपासना करा.

=====ooooo0ooooo======